# चिपळूण नगर परिषद, चिपळूण
## जाहीर निवीदा
### (बांधकाम विभागाकडील तांत्रिक व विकास कामांसाठी ३ सिव्हील इंजिनिअर पदविकाधारक यांची सेवा पुरविणे)

चिपळूण नगर परिषद हद्दीतील खालील रकाना २ करीता रकाना ३ मधील सेवा पुरविणेकामाचे मासिक/वार्षिक ठोक रक्कम रुपयांत सिलबंद निवीदा मागविणेत येत आहेत. सिलबंद निविदा दोन लखोटा पध्दतीने मागविणेत येत आहेत. इच्छुक संस्था/व्यक्ती/ कंपनी यांनी त्यांच्या विहीत नमुन्यातील सिलबंद निवीदा दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सर्वसाधारण विभागातील निविदा पेटीमध्ये टाकाव्यात.

| अ.क्र. | कामाचे नांव | पुरवठयाच्या सेवा | निविदा फॉर्मची रक्कम | बयाणा रक्कम डि.डि./ मुदत ठेवने | कामाचा कालावधी | निविदाकारांची पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | चिपळूण नगरपरिषद बांधकाम विभागासाठी ३ सिव्हिल इंजिनियर सेवा पुरविणे पदविका धारक (डी.ई. सिव्हिल) | १.बांधकाम विभागाकडील विविध प्रकारची अंदाजपत्रके तयार करणे.<br>२. तांत्रिक मंजूरी प्राप्त करणे,<br>३. कामांना लाईन आऊट देणे,<br>४.साईडसुपरव्हीजन करणे,<br>५. कामांची मोजमापे घेणे व रेकॉर्डींग करणे व<br>६.मा.मुख्याधिकारी यांचे अधिपत्याखालील बांधकाम विभागाकडील तांत्रिक कामे करणे.<br>मासिक ठोक रक्कम | ५००/- | ५,०००/- | १ वर्ष | शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य विषयातील पदविकाधारक (डी.ई.सिव्हील) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१ निविदा फॉर्म नगर परिषद लेखा विभागात विहित नमून्यातील अर्जासोबत फॉर्मची किंमत रोखीने भरल्यानंतर अभिलेख भांडार विभागात दिनांक १७/०८/२००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

२ निविदा दोन लखोटा पध्दतीने भरावयाची असून लखोटा क्रमांक १ मध्ये पात्रता संबंधी कागदपत्रे तसेच निविदा अनामत रकाना क्रमांक ५ मधील रक्कमेचा मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे नांवे असलेला डि.डि. अथवा ठेव पावती किमान १ वर्ष मुदतीची ठेवणे आवश्यक आहे. तसेच लखोटा क्र.२ मध्ये निविदा ठेवणेची आहे.

३ निविदापूर्व बैठक दिनांक २०/०८/२००९ रोजी सकाळी ४.०० वाजता मुख्याधिकारी चेंबरमध्ये होईल.

४ निविदा लखोटा क्रमांक १ दिनांक २१ /०८/२००९ रोजी सायं.४.०० उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येईल.

५ लखोटा क्रमांक १ मधील पात्र निविदा धारकांची यादी त्याच दिवशी सायं. ६.०० वाजता नगर पालिकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल व त्याबाबत आक्षेप दिनांक २४ /०८/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्विकारणेत येतील.

६ पात्र निविदाधारकांच्या निविदा दिनांक २४/०८/२००९ रोजी उपस्थित निविदा धारकांसमोर सायंकाळी ४.०० वाजता उघडणेत येतील.

७ निविदा भरणेपूर्वी निविदा फॉर्म व प्रारुप करारनाम्यामधील अटीचा अभ्यास करुन निविदा धारकांनी निविदा भरावयाची आहे. निविदा अपूर्ण आढळल्यास फेटाळण्यात येईल व दरपत्रक उघडले जाणार नाही.

८ निविदा फॉर्म टक्केवारी स्वरुपात न देता निव्वळ ठोस स्वरुपात देणे आवश्यक आहे. टक्केवारी निविदा स्विकृत केली जाणार नाही.

९ सर्व अथवा कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत आला आहे.

निवीदा क्रमांक :-०९०८९२ दिनांक :- १०/०८/२००९

मुख्याधिकारी अध्यक्ष

चिपळूण नगर परिषद, चिपळूण

# बांधकाम विभागातील सिव्हिल इंजिनियर सेवा पुरविणे संबधी अटी व शर्ती.

१. बांधकाम विभागातील सिव्हिल इंजिनियर सेवा पुरवठा धारकांने निविदा मंजूर झाल्यावर सोबतचे करारनाम्याप्रमाणे करारनामा करावयाचा आहे. त्यासोबत अनामत म्हणून देकारांचे १.५० टक्के रक्कम चिपळूण नगर परिषद यांचे नांवे डि.डि अथवा ठेव स्वरुपांत भरावयाची आहे. (ठेव किमान १ वर्षे मुदतीची असणे आवश्यक आहे.)

अ) नगर पालिका इंजिनियर व मुख्याधिकारी यांचे नियंत्रणास अधिन राहून न.पा. हद्दितील विविध बांधकाम विषयक कामांची पाहणी करुन लागू डि.एस.आर. दराने अंदाजपत्रके तयार करुन सादर करणे व त्या सोबत आवश्यक असणारी सर्व तांत्रिक बाबी, नकाशे व साईड प्लॅनसह परिपूर्ण सादर करणे.

ब) नगर पालिका इंजिनियर यांनी यादी दिलेल्या कामांची नियुक्त ठेकेदार यांना लाईन आऊट देणे, प्रत्यक्ष कामाचे वेळी कामाचे ठिकाणी उपस्थित रहाणे, सर्व तांत्रिक बाबींची खात्री करुन पूर्तता करणे व त्याचा दैनंदिन अहवाल इंजिनियर यांना सादर करणे.

क) दिलेल्या कामांची मोजमापे दैनंदिन नोंदविणे, झालेल्या कामाप्रमाणे बिल तयार करणे, मोजमाप पुस्तके लिहिणे इत्यादी तांत्रिक कामे पूर्ण करणे.

ड) तांत्रिक मंजुरीसाठी पाठवावयाच्या अंदाजपत्रकांचे बाबतीत आवश्यक ते कागदपत्रे पूर्ण करणे, संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करणे व मंजुरीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे.

इ) नगर पालिका विकासात्मक कामांसाठी भूसंपादन किंवा अन्य कामांसाठी म्यु.पल इंजिनियर यांचे आदेशाने आवश्यक ते तांत्रिक मोजमापे, पाहणी अहवाल आवश्यतेनुसार सादर करणे.

फ) नगर पालिका हद्दितील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे तत्संबंधी कारवाईचे वेळी आवश्यक ते तांत्रिक सहकार्य, तांत्रिक अहवाल देणे, कार्यवाहीसाठी मदत करणे.

ग) नगर पालिका विकास व विविध कामांचे संबंधात आवश्यकता असल्यास न.पा. हद्दिबाहेर वरिष्ठ कार्यालयामध्ये जाणे व आवश्यक ते कागदोपत्री पूर्तता करणे.

२. वरील सर्व तांत्रिक कामांची पूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेची असेल.

३. सेवा पुरवठादार संस्थेने नगर पालिकेसाठी नियुक्त केलेले तांत्रिक कर्मचारी यांनी दररोज न.पा. कार्यालयात म्यु.पल इंजिनियर, प्रशासकिय अधिकारी/मुख्याधिकारी यांनी ठरवून दिलेल्या वेळेत उपस्थित रहाणे.

४. कार्यालयीन कामकाजासाठी उपरोक्त काम वरील अट क्र.१(ग) प्रमाणे बाहेरगावी जावे लागल्यास मासिक मानधनाव्यतिरिक्त शासकिय नियमाप्रमाणे त्रितिय श्रेणी (क) प्रमाणे प्रवासभत्ता अनुज्ञेय असेल.

५. उपरोक्त कामासाठी शहरात केलेल्या फिरतीसाठी कोणताही भत्ता किंवा खर्च मिळणार नाही.

६. अट क्र.१ मधील सर्व तांत्रिक कामांची तांत्रिक जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेवर राहील. यामध्ये नगर पालिकेचे कोणतेही नुकसान झाल्यास किंवा लेखा परिक्षणात तांत्रिक चुकीमुळे वसुली करावी लागल्यास काम करणारे ठेकेदार यांच्या इतकेच तांत्रिक पुरवठा करणारी संस्थाही जबाबदार आहे.

७. तांत्रिक कर्मचारी नगर पालिका सुचनेप्रमाणे कार्यालयात किंवा न.पा. मध्ये उपस्थित न राहील्यास त्या दिवसाच्या मासिक मानधनातून त्या दिवसाची रक्कम कापण्यात येईल.

८. कामाचा आदेश दिल्यानंतर कामाची मुदत संपेपर्यतच्या कालावधीतील जी कामे कमिट्यांमध्ये मंजूर होतीत त्या सर्व कामांच्या तांत्रिक बाबींची संपूर्ण पूर्तता करणेपासून कामांना तांत्रिक मंजुरी प्राप्त करणेची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक व मान्य असल्याबद्दल मी खाली सहि करीत आहे.

निविदा धारकाची सहि.
कंपनी / संस्था असल्यास
त्याचा रबर स्टॅम्प आवश्यक.

टीप : निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.